आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – दुपारी ४ वाजता

१ ऑक्टोबर २०२३ – रविवार

प्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार आज स्वच्छतेसाठी एक तारीख एक तास एक साथ मोहिमेत नागरिकांनी मोठ्या संख्येनं भाग घेतला. महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहण्यासाठी आज सकाळी १० वाजता स्वच्छता मोहिमेसाठी एक तास श्रमदान करण्याचं आवाहन मोदी यांनी नागरिकांना केलं होतं. त्यांनी आज स्वतः सहभागी होत या मोहिमेत देशाचं नेतृत्व केलं. युट्युबर अंकित बैयनपुरीया यांच्यासमवेत प्रधानमंत्र्यांनी स्वतः केरकचरा काढून स्वच्छतेचं महत्व पटवून दिलं.

बाजारपेठा, रेल्वे मार्ग, जलाशय, पर्यटन स्थळं, प्रार्थनास्थळं यासह सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता उपक्रमात सर्व स्तरातले नागरिक सहभागी झाले.

राज्यात, नागरिकांच्या श्रमदानाने स्वच्छता मोहीम राबवली गेली. नगरविकास विभागानं या मोहिमेचे आयोजन केलं.

मुंबईत आज गिरगाव चौपाटीवर नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या जोडीनं, राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मान्यवरांनी स्वत: हातात झाडू घेऊन श्रमदान केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यामुळे आज स्वच्छतेची ही लोकचळवळ झाली आहे, असं यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बातमीदारांशी बोलतांना म्हणाले. राज्यात शहरी आणि ग्रामीण मिळून ७२ हजारापेक्षा जास्त ठिकाणी स्वच्छतेची ही मोहीम पार पडली असून, त्याबद्धल मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले. स्वच्छता हा काही केवळ एक दिवस, आणि कुणीतरी एकानंच राबवण्याचा कार्यक्रम नाही, तर ती नेहमीसाठीची आपली जीवनशैली असली पाहिजे, असं ते म्हणाले….

**होल्ड - बाईट - मुख्य़मंत्री**

केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे जुहू चौपाटी इथं स्वच्छता अभियान मोहिमेत सहभागी झाले.

स्वच्छता अभियानांतर्गत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला अभिवादन करून बारामती शहरात नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांसह स्वच्छता मोहिमेत भाग घेतला.

या स्वच्छता अभियानाअंतर्गत आकाशवाणी मुंबईच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आकाशवाणीच्या परिसराची स्वच्छता केली.

**<><><><><><>**

स्वच्छता ही सेवा अभियान तसंच छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या साडेतीनशेव्या वर्षानिमीत्त राज्यात आज गडकिल्ल्यांच्या स्वच्छता अभियानालाही सुरुवात झाली. यानिमीत्त आज मुंबईत शिवडी इथल्या किल्ल्यावर आयोजित स्वच्छता मोहीमेत विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासह भाजपाचे अनेक नेते आणि पदाधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. यावेळी फडनवीस यांनी राज्यभरातल्या गडकिल्ले स्वच्छता अभियानाचा ऑनलाईन पद्धतीनं प्रारंभही केला. या मोहीमेअंतर्गत आज राज्यभरातल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे विद्यार्थी विविध गडकिल्ल्यांवर श्रमदान करणार आहेत.

गड किल्ले हे आपले अभिमान आहेत आणि त्यांच्या स्वच्छतेसाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे असं फडनवीस यावेळी म्हणाले.

धाराशिव जिल्ह्यातही तुळजापूर मधल्या नळदुर्ग किल्ला परिसरात सोलापूरचं क्षेत्रीय प्रचार कार्यालय आणि धाराशीवच्या पर्यटन जनजागृती संस्थेनं ही मोहीम राबवली.

<><><><><>

मुंबईत एकात्मिक बालविकास प्रकल्प अंधेरी पश्चिम इथं राष्ट्रीय पोषण माह अभियानाची सांगता झाली. राष्ट्रीय पोषण महिन्याच्या निमित्तानं अंधेरी पश्चिम प्रकल्पानं, डॉक्टरांच्या सल्ल्यानं नवजात बालकांना स्तनपान, पालकांचं समुपदेशन, पोषणाला प्रोत्साहन देणारे खेळ आणि पोषणाचं महत्त्व, तृणधान्यांचं महत्त्व, आहार आरोग्य जनजागृती, रॅली, पथनाट्ये आदी कार्यक्रमांचं आयोजन केलं होतं. सर्व सेविका, मदतनीस आणि मुख्य सेविका यांनी पोषण प्रतिज्ञा घेऊन या अभियानाची सांगता केली.

<><><><><>

धनगर समाजाला अनुसूचित जमातीचं आरक्षण देऊ नये, या प्रमुख मागणीसाठी आज गडचिरोलीत हजारो आदिवासींनी चक्काजाम आंदोलन केलं. यावेळी आंदोलनकर्त्यांनी राज्य आणि केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली.

<><><><><>

चीनमधे हँगझोऊ इथं सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत आज आठव्या दिवशी भारतानं आणखी एक सुवर्णपदक आणि दोन रौप्य पदकांची कमाई केली. नेमबाजीत पुरुषांचा सांघिक ट्रॅप प्रकारात किनार दार्यस, जोरावर सिंग संधू आणि पृथ्वीराज तोंडायमन यांच्या संघानं ३६१ अंकांची कमाई करत सुवर्णपदक पटकावलं. वैयक्तिक पात्रता फेरीत या तिघांनीही अंतिम फेरीत धडक मारली आहे.

महिलांच्या ट्रॅप प्रकारात मनीषा कीर, प्रीती रजत आणि राजेश्वरी कुमारी यांना भारताला रौप्यपदक मिळवून दिलं. त्यांच्यापैकी फक्त मनीषा कीर अंतिम फेरीसाठी पात्र ठरली.

महिलांच्या वैयक्तिक गोल्फ स्पर्धेत अदिती अशोकनं रौप्यपदक पटकावलं. या स्पर्धेत भारतानं आतापर्यंत, ११ सुवर्ण, १६ रौप्य आणि १४ कांस्य पदकांसह एकूण ४१ पदकांची कमाई केली आहे. पदकतालिकेत भारत सध्या चौथ्या स्थानावर आहे.

<><><><><>

अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यानं काल रात्री साडे ८ ते साडे १० च्या दरम्यान पणजी आणि रत्नागिरी दरम्यानची किनारपट्टी पार केली. हा कमी दाबाचा पट्टा येत्या २४ तासात आणखी कमकुवत होऊन ईशान्येकडे जाण्याची शक्यता आहे. त्यामुळं कोकण आणि गोवा किनारपट्टीचा चक्रीवादळाचा धोका टळला आहे.

हवामान विभागानं आज रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि साताऱ्यात ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातले काही जिल्हे वगळता राज्यातल्या इतर भागातही जोरदार पावसाची शक्यता आहे.

//<><><><><>//